# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २६.०४.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०२) इतिवृत्त**

बुधवार दिनांक २६ एप्रिल २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. रेणुकादास (राजु) वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ११.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१) श्री. खान मुजीब मिर आलम खान
२) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
३) सौ. दलाल लता श्रीनिवास
४) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
५) श्री. दिलिप नारायण गायकवाड
६) श्री. पांडे विनायक प्रभाकर
७) डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
८) श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
९) श्री. दाभाडे हिम्मतराव साळुबा
१०) श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
११) श्री. मो. जावेद मो. इसाक
१२) श्री. शिरसाट संजय पांडुरंग
१३) श्री. सावंत मधुकर दामोधर
१४) श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

**श्री. मुजीब खान :** मा. सभापतींच्या निवडणूकीनंतर ही आपली पहिलीच सभा आहे. नवनिर्वाचित सभापतींना पहिल्या सभेसाठी शुभेच्छा. आज फक्त विषयपत्रिकेवरच चर्चा करण्यात यावी. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य राहिल व शहराच्या विकासाच्या संदर्भात निर्णय घेण्यास मदत होईल.

**श्री. रविकांत गवळी :** मा. सभापती यांना पहिल्या सभेसाठी शुभेच्छा. स्थायी समितीच्या कामकाजामध्ये सर्वांचे सहकार्य लाभेल. विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात यावी.

**सौ. लता दलाल :** मा. सभापतींचे मन:पूर्वक हार्दिक स्वागत. शहराच्या विकासाची चांगली कामे व्हावीत अशी अपेक्षा आहे. आजच्या बैठकीत अनेक अधिकारी रजेवर आहेत. एवढे अधिकारी एकाच वेळी रजेवर जाणे बरोबर नाही. डांबरीकरणाची अनेक कामे, नवीन व जुने अर्थसंकल्पातील कामे यासाठी अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जे अधिकारी आजच्या सभेस नाहीत त्यांचे दुय्यम अधिकारी किंवा सहाय्यक देखील नाहीत. त्यांना पुढच्या बैठकीपासून समज देण्यात यावी.

**मा. सभापती :** सहा अधिकारी सुटीवर आहेत. प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात येते की, सभा नियोजित वेळेला सुरू होईल. नियोजित वेळेपासून फक्त पाच

मिनिटांपर्यंतच अधिकाऱ्यांना सभागृहात प्रवेश देण्यात येईल. याची सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**श्री. मधुकर सावंत :** काल मी मुख्य लेखा परिक्षक यांना पत्र दिले आहे. सदर पत्रात प्रश्नावली दिलेली आहे. सभागृहात माहिती देण्याचे सांगितले होते. सभागृहात त्यांनी उत्तर द्यावे.

**मा. सभापती :** संबंधित सदस्यांनी दिलेल्या पत्राचे लेखी स्वरूपात उत्तर पुढील सभेपुर्वी देण्यांत यावे.

**विषय क्र.०२**

दिनांक १०.४.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (का.प.क्र.१) कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १०.४.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.०३ :**

उप आयुक्त (महसुल),महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, सन २००६-०७ या वर्षासाठी चिकलठाणा आठवडी बाजार फी वसुलीचा ठेका देण्यासाठी अल्पमुदतीची जाहीर लिलाव / निविदा सूचना (दुसरी वेळ) स्थानिक वर्तमानपत्राज जा.क्र./मनपा/मामअ/९०३/२००६, दिनांक ३१.०३.२००६ प्रसिध्दी दिली असता निविदा / बोली दिनांक ०४.०४.२००६ रोजी दुपारी ३.३० वाजता मालमत्त विभागात प्रत्यक्ष बोलीस सुरूवात केली असता दोन जणांनी भाग घेतला व बोली बोलण्यास नगार दिला. तेव्हा त्यांना लेखी स्वरूपात बोली देण्यास उप आयुक्त (महसुल) यांनी सांगितले. त्यानुसार खालील प्रमाणे दोन जणांनी लेखी दिलेले आहे.

१ खान जहाँगीर मे. सौदागर एजन्सी रू.८०००/- प्रतीबाजार

२ शकील अहमद महमद जमीरूद्दीन रू.८५००/- प्रतीबाजार

शकील अहमद महमद जमीरूद्दीन यांची जास्तीची लेखी बोली रक्कम रू.८५००/- असल्याने संबंधीतास उपआयुक्त (महसूल) चर्चेस बोलाविले असता संबंधीताने रक्कम रु. ८५००/- प्रतीबाजार ऐवजी ८६००/- प्रती बाजार देण्याचे मान्य केले असल्याने प्रती बाजार ८६०० x ५२ = बाजाराची किंमत रू.४,४७,२००/- अशी होते. त्याच्या २५% रक्कम रू. १,११,८००/- व २५% रू.१,११,८००/- राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी घेवून शकील अहमद महमद जमीरूद्दीन यांनी जास्तीची बोली रू.८६००/- प्रती बाजार देण्याची मान्य केल्याने दिनांक १.४.२००६ ते ३१.३.२००७ पर्यंत ठेका देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००६-०७ या वर्षासाठी चिकलठाणा आठवडी बाजार फी वसूलीचा ठेका देण्यासाठी झालेल्या लिलावानुसार जास्तीचे बोलीधारकाशी झ ाालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार शकील अहमद महमद जमीरूद्दीन यांचे रू.८६००/- प्रती बाजार या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.०४ :**

उप आयुक्त (महसूल),महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मुख्य कार्यालयातील मुख्य इमारतीमधील कॅन्टीन भाडेतत्वावर देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/६७९/२००६, दिनांक २१.०३.२००६ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व जाहिर निविदा / लिलाव बोली पध्दतीने दिनांक

२७.०३.२००६ रोजी दुपारी ३.०० वाजता, उप आयुक्त (महसूल) व मालमत्ता अधिकारी यांनी बोलीस सुरूवात केली असता खालील दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.अलोक नरेंद्र देसाई | रू.५२५०/- प्रतीमाह |
| २ | प्रशांत मधुकर देशपांडे | रू.५२००/- प्रतीमाह |

या विभागाने कॅन्टीन भाडेतत्वावर देण्यासाठी आधारभुत किंमत प्रतीमाह रू.५००४/- ठेवली असता प्रत्यक्ष बोलीत रू.५२५०/- श्री.अलोक नरेंद्र देसाई यांनी मनपाच्या आधारभुत भाडयापेक्षा जास्त म्हणजे रू.५२५०/- बोली बोलली आहे.

तरी श्री.अलोक नरेंद्र देसाई यांच्याकडून २५% आगाऊ भाडे रू.१५७५०/- भरून घेवून व २५% बँक गॅरंटी घेवून व करारनामा करून घेण्यात येईल.

तरी श्री. अलोक नरेंद्र देसाई यांना सदरील कॅन्टीन भाडेतत्वावर दिनांक ०१.०४.२००६ ते ३१.०३.२००७ पर्यंत प्रती माह रू.५२५०/- देण्याचे मान्य केले असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यालयातील मुख्य इमारतीमधील कॅन्टीन भाडेवत्तत्वावर देण्यासाठी आधारभूत भाडयापेक्षा जास्तीचे बोलीधारक श्री. अलोक नरेंद्र देसाई यांना प्रती माह रु. ५२५०/- या दराने दि.०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ पर्यंत कॅन्टीन भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. विष्णुनगर येथील नाल्यास नाला संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २८,९९,८८ चे तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक ०३/०२/२००६ रोजी मान्यता दिली आहे. तसेच दिनांक १८/०२/२००६ रोजी मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. २०३/८ नुसार मान्यतेचा ठराव झाला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलया असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा सादरीकरणाच्या दिवशी दर भरलेल्या एकूण (५) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गोसावी एस.के. | २१.२९% कमी दराने |
| २. | श्री.स.समीउद्यीन रझवी | १४.९९% कमी दराने |
| ३. | श्री.सोहेल सिद्यीकी | १०.९९ % कमी दराने |
| ४. | मे.सुंदर कन्स्ट्रक्शन | १०% कमी दराने |
| ५. | श्री.डि.मंजितसिंग | ९.०९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२९% कमी दराची श्री.गोसावी एस.के. यांची निविदा आहे. कार्यादेश देण्यापुर्वी संबंधीत निविदाधारकाने ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा करावी या अटीवर दिनांक ०५/०४/२००६ रोजी सदरची निविदा स्विकारण्याची शिफारस मा. आयुक्त महोदय यांनी केली आहे. करीता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. रविकांत गवळी :** विष्णूनगर भागात नालासंरक्षित भिंत बांधणे गरजेचे आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१. २९% टक्के कमी दराने योग्य प्रकारे काम

होणार नाही. याची सर्व अधिकाऱ्यांना देखील कल्पना आहे. कामाची गुणवत्ता मिळणार नाही. सदर प्रकरणी फेरनिविदा काढण्यात याव्यात.

**मा. सभापती :** स.सदस्यांनी उपयुक्त सुचना मांडलेली आहे. २१. २९% कमी दराने निविदा आहे. शिवाय इतर वजावट जाता सुमारे २५ ते २६ टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी होईल. कामाची गुणवत्ता मिळणार नाही. अल्पमुदतीची फेरनिविदा काढावी व लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर कामाकरीता अल्पमुदतीची फेर निविदा मागविण्यात येऊन लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रंगीन गेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेचया कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संतोष मोटेगांवकर | २८% जास्त दराने |
| २ | मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन | ३०% जास्त दराने |
| ३ | श्री.शेख मसुद | ३२% जास्त दराने |
| ४ | मे.शहा कन्स्ट्रक्शन | ३६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. संतोष मोटेगांवकर यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम स्कील्ड लेबर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील कामे २५ % जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुरी करुन मा. स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम सँपल वर्क 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ७,६१,०८४/- एवढी असून निविदा २५ % जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ९,५१,३५५/- होणार आहे.

तरी श्री. संतोष मोटेगांवकर यांची २५ % जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. त्रिंबक तुपे :** विषय क्र. ६ ते १० कोणत्या निकषा आधारे ठेवण्यात आले? सदर कामाचे गुत्तेदार हे पाणी पुरवठा, ड्रेनेज, रस्ते इ. कामे करतात. ही कामे ते कोणते निकष लावून करणार ? सारख्याच प्रकारच्या कामासाठी असलेल्या निविदांमध्ये काही ठिकाणी ३० % जास्त तर काही ठिकाणी १८ % जास्त दराची आहे. आपसात संगनमत केलेले दिसते. ही कामे ऐतिहासिक दरवाजांची आहेत. आपणांस विनंती आहे की, यासर्व दरवाजांची कामे

एकत्रित करुन एकच निविदा काढावी आणि ऐतिहासिक इमारतींची कामे करण्याचा अनुभव असणाऱ्या गुत्तेदारांना देण्यात यावीत.

**डॉ. आशा बिनवडे :** विषय क्र. ६ ते १० ऐतिहासिक दरवाजांचे देखभाल दुरुस्ती संबंधीचे आहेत. या कामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे का? अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या निविदा आल्यामुळे स्थायी समितीकडे पाठविण्यात आले आहे काय? ही कामे कुशल कारागीरांकडून करुन घ्यायची असतात. अंदाजपत्रक बरोबर झालेले नाही का? ठेकेदारांना याची माहिती आहे, अभियंत्यांना माहिती नव्हती का ? वाढीव खर्चाची तरतुद कुठून करणार ? सर्व कामांसाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात.

**शहर अभियंता :** जुने व ऐतिहासिक पाच दरवाजांची दुरुस्तीचे काम करण्याचे ठरवलेले आहे. या कामासाठी महानगरपालिकेने ५० लाखाची तरतुद केलेली असून शासनाकडून निधी मिळणार नाही.

**श्री.संजय शिरसाट :** पाच दरवाजांच्या सौंदर्यीकरणाची कामे आपण स्वतःहून सुरु करत आहोत. सदर ऐतिहासिक दरवाजांची मालकी महापालिकेची आहे का? केंद्र शासनाची किंवा राज्य शासनाची असेल निविदा काढण्यापुर्वी त्यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय ?

**शहर अभियंता :** पुरातत्व विभागाकडे तीन दरवाजे आहेत. बाकीचे दरवाजे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे राहतात.

**श्री. मुजीब खान :** मा. विभागीय आयुक्त यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. प्रशासनाकडून सभागृहाची दिशाभूल होत आहे.

**श्री. संजय शिरसाट :** ऐतिहासिक दरवाजे कोणाच्या अखत्यारित येतात. ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय? कशा आधारे काम सुरु करणार आहोत?

**शहर अभियंता :** ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. स्थानिक प्रशासनाने कामे करावयाची आहेत.

**श्री. संजय शिरसाट :** आपल्याला वाटते म्हणून ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही, असे आहे काय? कशा आधारे निविदा काढण्यात आली ? सदर प्रस्तावात अनेक इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. ना हरकत प्रमाणपत्र न घेता निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. महानगरपालिकेचा निधी वायफळ जाणार आहे. ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नाही तर खर्च कोणाकडून घेणार ? नमुन्याखातीर इन्फोटेक च्या तज्ज्ञांकडून मान्यता झाल्यानंतर कार्यादेश देणार. हा प्रस्तावच कशा पध्दतीने सादर केला कळायला मार्ग नाही. एनओसी नसतांना टेंडर का काढले.

**मा.सभापती :** शहर अभियंता यांना स्पष्ट सूचना देण्यात येते की, सदर ठेकेदारांस अशा कामाचा अनुभव आहे किंवा नाही.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिकेच्या अनेक वार्डातील कामे शिल्लक आहेत. रस्ते दुरुस्ती, पाणी पुरवठयाचे कामासाठी पैसा कमी पडतो. या कामासाठी पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र नाही, शासन अनुदान नाही. कशासाठी धाडस करण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा. कुशल कामगारांच्या संदर्भात विचार केलेला नाही. प्रस्ताव ठेवतांना विचार करण्यात आलेला दिसून येत नाही. सदर पाचही प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने ठेवण्यात आले आहेत. फेटाळण्यात यावेत.

**श्री.संजय शिरसाट :** ना हरकत प्रमाणपत्र न घेता निविदा काढण्यात आल्या. याची जबाबदारी कोणावर निश्चित करणार ? मंजुरी दिली तर यास स्थायी समिती देखील जबाबदार राहील.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी खुलासा करावा की, ना हरकत प्रमाणपत्राची गरज वाटली नाही काय?

**शहर अभियंता :** शासन राज्य पुरातत्व विभागांतर्गत जे दरवाजे येतात ते सोडले. स्थानिक प्रशासनाने करावे त्यामुळे ठेवण्यात आले आहे.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी सविस्तर खुलासा करावा.

**शहर अभियंता :** ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. तीन दरवाजे शासनाच्या अधिपत्याखाली आहेत.

**श्री.मुजीब खान :** सभागृहाची दिशाभूल होत आहे. मागे सर्वसाधारण सभेमध्ये ऐतिहासिक दरवाजे मोडकळीस आले आहेत या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. स्थायी समिती सभेत देखील चर्चा झाली होती. मा. आयुक्तांकडे पूर्ण अहवाल आहे. पाच दरवाजांचे काम करण्यास मंजुरी दिलेली आहे.

**शहर अभियंता :**ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. अंदाजपत्रकामध्ये ५० लाख रुपये ठेवलेले होत. महानगरपालिकेने जतन करावे म्हणून निविदा काढण्यात आल्या आहेत.

**मा.सभापती :** पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय कोणत्याही निविदा प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**त्रिंबक तुपे :** अर्थसंकल्पात तरतुद होती म्हणून ना हरकत प्रमाणपत्र घेऊ नये का?

**श्री. संजय शिरसाट :** आपणांस खर्च करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय निविदा प्रसिध्द करण्यात आल्या ही गंभीर बाब आहे. स्थायी समितीने ना हरकत प्रमाणपत्रा शिवाय मंजुरी दिली व त्यास कार्यादेशही देण्यात आले आणि जर पुरातत्व विभागाने हरकत घेतली किंवा काम करु दिले नाही तर आपण काय करणार? अंदाजपत्रकाला कशा आधारे ना हरकत प्रमाणपत्र देतील. त्यांचेकडे त्यांची स्वत:चे तंत्र असेल. त्याप्रमाणे त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन असतो. सदर ५० लाख त्यांना द्यायचे असते व काम करुन घ्यायचे असते.

**शहर अभियंता :** त्यांच्याकडे हे दरवाजे नाहीत असे माझे मत आहे.

**मधुकर सावंत :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १ ते ४९३ पाहण्यात यावे व त्यात कुणाचा अधिकार आहे ते दाखवावे.

**श्री. संजय शिरसाट :** अशा चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव येवू नयेत. सक्त ताकीद देण्यात यावी.

**सौ.लता दलाल :** पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येतात. केंद्र सरकारकडे या कामासाठी ठराविक निधी असतो. तो निधी आणण्याचा प्रयत्न करावा अशी संबंधितांना सूचना द्यावी.

**श्री. मुजीब खान :** यापुर्वी दोन वेळा स्थायी समितीमध्ये चर्चेस आलेले आहे. प्रभारी आयुक्त यांच्याकडे माहिती नसावी. मा. आयुक्तांशी चर्चा करण्यात यावी.

**मा.सभापती :** सर्व स.सदस्यांच्या लक्षात ही बाब आली त्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येते. ना हरकत प्रमाणपत्र न घेता निविदा प्रसिध्द करण्यात आल्या, काम करतांना अनुभव असलेल्यांनाच काम देण्यात यावे. अंदाजपत्रकात दर दिलेले असतांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर का भरुन येतात? शहर

सुंदर व्हावे असे सर्वांनाच वाटते. ना हरकत प्रमाणपत्र न घेणे ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. जोपर्यंत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात येत नाही तोपर्यंत निविदा काढू नये. कुशल कारागीरांकडून करुन घ्यावयाचे असेल तर सर्व दरवाजांच्या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करावे व अल्पमुदतीची निविदा काढण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करण्याचे काम कुशल कारागीरांकडून करून घ्यावयाचे असल्याने अशा कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदरील काम करून घ्यावे. आणि पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच या सर्व कामांची मिळून अल्पमुदतीची एकच निविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **नौबत दरवाजा** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १ भरलेले निविदापत्रक प्राप्त झाले. सदर निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ४५.४६ % जास्त दराने |

प्राप्त निविदा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.४६ % जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम स्कील्ड लेबर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे ३० % जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा. स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम सॅंपल वर्क 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ८,३६,९१५/- एवढी असून निविदा ३० % जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. १०,८७,९८९/- होणार आहे.

तरी मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची ३० % जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करण्याचे काम कुशल कारागीरांकडून करुन घ्यावयाचे असल्याने अशा कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदरील काम करुन घ्यावे आणि पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच या सर्व कामांची मिळून अल्पमुदतीची एकच निविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **काळा दरवाजा** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.शेख मसुद | १८.१० % जास्त दराने |
| २) | श्री.संतोष मोटेगांवकर | २६.३५ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. शेख मसूद यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१० % जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम स्कील्ड लेबर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे १८.१० % जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम सँपल वर्क 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज'या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ६,६९,०७२/- एवढी असून निविदा १८.१० % जास्त दराची असल्याने एकूण खर्च रु. ७,९०,१७४/- होणार आहे.

तरी शेख मसुद यांची १८.१० % जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करण्याचे काम कुशल कारागीरांकडून करुन घ्यावयाचे असल्याने अशा कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदरील काम करुन घ्यावे आणि पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच या सर्व कामांची मिळून अल्पमुदतीची एकच निविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **पैठणगेट** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | ए.आर.कन्स्ट्रक्शन | २० % जास्त दराने |
| २) | शहा कन्स्ट्रक्शन | २५ % जास्त दराने |
| ३) | श्री.संतोष मोटेगांवकर | ३५ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ए.आर. कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २० % जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम स्कील्ड लेबर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे २० % जास्त दराने मा. आयुक्तांनी मंजुर करुन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित

केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम सँपल वर्क'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ५,७६,३९५/- एवढी असून निविदा २० % जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ६,९१,६७४/- होणार आहे.

तरी ए.आर.कन्स्ट्रक्शन यांची २० % जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऐतिहासिक दरवाजांची दुरुस्ती करण्याचे काम कुशल करागीरांकडून करुन घ्यावयाचे असल्याने अशा कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदरील काम करुन घ्यावे आणि पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच या सर्व कामांची मिळून अल्पमुदतीची एकच निविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, **रोशन गेट** या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.शहा कन्स्ट्रक्शन | ३०.३३ % जास्त दराने |
| २) | मे. ए.आर. कन्स्ट्रक्शन | ४१.४२ % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३ % जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे इतर कामापेक्षा वेगळे आहे. सदरील काम स्कील्ड लेबर यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे, त्यामुळे वाटाघाटी अंती सदरील काम हे ३० % जास्त दराने मा.आयुक्तांनी मंजुर करुन मा. स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदरील काम ऐतिहासिक वास्तु जतन करण्याचे असल्याने प्रथम सँपल वर्क 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज' या संस्थेच्या तज्ज्ञांकडून मान्य करुन मगच कामाचे कार्यादेश देण्यात येणार आहे. प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही ६,७८,६०७/- एवढी असून निविदा ३० % जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रु. ८,८२,१८९/- होणार आहे.

तरी मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची ३० %जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ऐतिहासिक दवाजांची दुरुस्ती करण्याचे काम कुशल कारागीरांकडून करुन घ्यावयाचे असल्याने अशा कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदरील काम करुन घ्यावे आणि पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच या सर्व कामांची मिळून अल्पमुदतीची एकच निविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ११ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करत आहेत की, पावसाळयामध्ये होणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी १ मे ते ३१ मे २००६ या कालावधीत मान्सुनपूर्व विशेष स्वच्छता मोहिम घेणे आवश्यक आहे. या विशेष स्वच्छता मोहिमेत प्रभाग निहाय खालील प्रमाणे कृती योजना तयार करण्यात आली आहे.

१) प्रभाग क्र. १ ते ६ मधील प्रभाग अधिकाऱ्यांनी निवडणूक वार्डनिहाय विभागात साचलेला घनकचरा साफ करणे व उचलणे, तंबलेले नाले व गटारे स्वच्छ करणे या बाबत तारीख निहाय सुक्ष्म कृती आराखडा सादर केला आहे.

२) स्वच्छतेचे दररोजच्या कामावर विपरीत परिणाम न होऊ देता ही विशेष मोहिम राबविण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांनी अतिरिक्त कर्मचारी व अतिरिक्त वाहने यांची मागणी केली आहे. महानगरपालिका आस्थापनेकडे सध्या हे मनुष्यबळ व वाहने उपलब्ध नसल्यामुळे खाजगी कंत्राटदारामार्फत एक महिन्यासाठी हे काम करुन घ्यावे लागेल.

३) सिडको प्रभागासाठी साफसाफाईच्या काढलेल्या निविदामध्ये मा. स्थायी समितीकडून वाहनाचे व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे दर मा. स्थायी समितीने मंजूर केलेले आहेत. तसेच कामगार कायद्याप्रमाणे प्रत्येक मजुरास किमान वेतन द्यावे लागेल.

४) या स्वच्छता मोहिमेत मलेरिया विभागामार्फत फावडा पार्टी मार्फत नाला वर्गीकरण, औषध फवारणी, धुरीकरण, गप्पी मासे सोडणे या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जाणार आहेत.

५) महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी नमुने घेणे, ड्रेनेज विभागामार्फत लिकेजेस शोधून काढणे या प्रतिबंधात्मक उपायायोजनासुध्दा या सोबत राबविण्यात येणार आहेत.

६) प्रभाग निहाय आवश्यक असणाऱ्या वाहनांचा व मजुरांचा व त्यावर येणाऱ्या खर्चाचा गोषवारा सोबत जोडला आहे.

तरी मा. स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

(सोबत खर्चाचा गोषवारा)

**संवाद :**

**श्री. मुजीब खान :** आपण नाला सफाईची कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४० % कमी दराने दिलेली आहेत. हे नाले साफ करणार आहे किंवा कोणते नाले साफ करणार आहे?

**मा. सभापती :** हा विषय वेगळा आहे.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ.व.उ.) यांनी नाला सफाई निविदा संदर्भात खुलासा करावा.

**कार्य.अभि. (ड्रे.वि.इ.) :** सालाबादा प्रमाणे तात्पुरते स्वरुपात नाल्यातील साफसफाईचा प्रस्ताव ठेवण्यात येतो. या ठिकाणी जाणीवपूर्वक तात्पुरता शब्दप्रयोग करीत आहे. आपणांस एक ते दीड मीटर गाळ काढणे एवढया रक्कमेत शक्य नाही. ज्या ठिकाणी अरुंद व अडचणीच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपामध्ये काम करण्याकरीता २५ ते ३० लाखाच्या रक्कमेचे अंदाजपत्रक करण्यात

येते. २० ते २५ ठिकाणी काढण्यात आलेले आहे. ३० ते ४० टक्के कमी दराने ते योग्य प्रकारे काम करु शकतील असे वाटत नाही. त्यांच्यावर कडक देखरेख ठेवणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** अधिकाऱ्यांनी खुलासा केलेला आहे कमी दराने कामे होणार नाही करता येणार नाही. तसे शॅर्ट टेंडर काढून स्थायी समितीपुढे ठेवावे.

**सौ.लता दलाल :** हा खर्च कोणत्या हेड मधून खर्च करणार आहात तसेच संपूर्ण महाराष्ट्रात अनेक लोक आजारी आहे. रोग पसरलेला आहे. प्रत्येक वार्डात तापाचे आठ ते दहा रुग्ण दिसून येतात. हे कोणत्या तापाचे रुग्ण आहेत. पावसाळा सुरु होण्याची वाट बघतो. ही मोहिम राबवितांना वेगवेगळी औषधे, दाट लोकवस्तीच्या भागात औषधांच्या उपाययोजना बाबत तरतुद करावी. कोणत्या लेखाशिर्षाखालील खर्च करण्यात येणार आहे?

**मा. सभापती :** मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियान यातून खर्च प्रस्तावित आहे.

**श्री. संजय शिरसाट :** एकूण सफाई कामगार किती आहेत? प्रस्तावासोबत दिलेल्या गोषवारात ११९७ दाखवले ते संशस्पद वाटते.

**कर निर्धारक व संकलक :** आस्थापना विभाग माझ्याकडे नाही. २००४ ला ११०० सेवेत नियमित केले. ८९४ मजुर आहेत. त्यापूर्वी २०० कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिलेली आहे. पुढच्या सभेत माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** जे जे प्रश्न उपस्थित करावयाचे आहे ते प्रश्न अधिकाऱ्यांना माहिती असणे आवश्यक आहे. असे प्रश्न माझेकडून त्यांना कळविण्यात येतील. त्या सभेत त्यांनी माहिती द्यावी. तीन दिवस अगोदर माझ्याकडे प्रश्न देण्यात यावेत.

**श्री. संजय शिरसाट :** सफाई कर्मचारी ११९७ दाखवले. २२० त्यांना पाहिजे. सभागृहात आस्थापनेचे माजी अधिकारी असतील त्यांनी माहिती द्यावी की सफाई कर्मचारी किती आहेत? सदर प्रस्ताव स्थगित ठेवून पुढील सभेत घेण्यात यावा.

**मा. सभापती :** हा विषय स्थगित ठेवण्यात येतो. विचारलेल्या प्रश्नासंबंधी खुलासा व्हावा.

**श्री. मुजीब खान :** जकातीबद्दल व ११२४ कर्मचाऱ्यांचे प्रश्नाबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी खुलासा मागविणे आवश्यक वाटले तर तीन दिवस अगोदर मला कळविण्यात यावे.

**सौ. लता दलाल :** स्थगित न ठेवता योग्य तो निर्णय घ्यावा. कारण शहरात साथीचे रोग होत आहे.

**मा. सभापती :** पुर्ण माहिती नसतांना कोणताही प्रस्ताव मंजूर होणार नाही. आवश्यक त्या बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सादरील प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

'राष्ट्रगितानंतर'सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद